

# संतभूमी संरक्षक संघर्ष समिती-महाराष्ट्र राज्य.



संस्थापक-अध्यक्ष-श्री हरिभक्त मधुसूदन महाराज, भामचंद्र डोंगर, पो.वासुली, ता.खेड (राजगुरुनगर), जि.पुणे

दिनांक: /१०/२०१

प्रति,

मा.

सन - २०१२

सस्नेह रामकृष्णहरि विनंती विशेष,

**विषय : तिर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत संत तुकोबांचा श्रीक्षेत्र भंडारा व भामचंद्र डोंगर सुरक्षित राखणे बाबत.**

**अर्जदार :- श्री. मधुसूदन पाटील महाराज** (अध्यक्ष- श्री संतभूमी संरक्षक संघर्ष समिती, भामचंद्र डोंगर, ता.खेड, पुणे)

महोदय,

महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यामध्ये श्री तिर्थक्षेत्र देहु ही **संतश्रेष्ठ तुकाराम महाराज** यांची जन्मभूमी असून जवळच त्यांचे **ध्यान-चिंतन तपोभूमीसाठी प्रसिध्द असे श्रीक्षेत्र भंडारा व भामचंद्र डोंगर** आहेत. सन २००८ मध्ये खाण व्यावसायीकांच्या अतिक्रमणामुळे या दोन्ही डोंगरांचे अखंडत्व व पावित्र्य धोक्यात आले, तसेच याच कालखंडात सरकारने **'डाऊ'** ही केमिकल कंपनी या दोन्ही डोंगरांच्या पायथ्याला आणली, त्यामुळे या पावन संतभूमीच्या रक्षणार्थ महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाने तीव्र आंदोलन छेडल्याने 'डाऊ' कंपनीचा येथील परवाना सरकारला अखेर रद्द करावा लागला.

आंदोलनांतर्गत मागणीची गांभीर्याने दखल घेऊन संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे येथील भंडारा व भामचंद्र डोंगर **महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाने ऑक्टोबर - नोव्हेंबर सन २०११ ला 'राज्य संरक्षित स्मारक' म्हणून घोषित केले.** पण, सदर डोंगरावर मालकी सांगणारे नेते, बिल्डर व खाण व्यावसायीकांनी या शासन निर्णयावर हरकती घेऊन सरकार दरबारी दबावतंत्राने डोंगरातील आपले गट नंबर संरक्षित क्षेत्रातून वगळण्यास भाग पाडले. त्यामुळे हरकती नंतरच्या (१४ मे २०१२) नवीन प्रस्तावाने या तपोभूमी डोंगराचे पावित्र्य व अखंडत्व पुन्हा धोक्यात आले आहे.

**विशेष बाब म्हणजे सन २००८ ला महाराष्ट्र शासनाने संत तुकाराम महाराज जन्म चतु:शताब्धी वर्ष महोत्सवाचे औचित्य साधून (सन २००८ तीक्षेवि) तीर्थक्षेत्र विकास आराखडा जाहीर केला.** पण.. त्यामध्ये **संत तुकोबांची ध्यान-तपोभूमी असणारे श्रीक्षेत्र भंडारा व भामचंद्र या दोन्हीं डोंगरांच्या सुरक्षिततेसाठी काहीच तरतूद केलेली नाही.** त्यामुळे आज राजकीय बिल्डर व्यावसायिकांसह एम.आय.डी.सी.ने सुध्दा या दोन्ही डोंगरांच्या संरक्षित केलेल्या क्षेत्रात अतिक्रमण केले आहे. **सरकारच्या या चुकीच्या औद्योगिकरण व विकास धोरणाविरोधात महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायामध्ये असंतोष निर्माण झाला असून याबाबत जनमत सरकारच्या विरोधात चालले आहे.**

**मा.महोदय यांना संतभूमी संरक्षक सघर्ष समिती** विनंती करीत आहे की, येथील प्राचिन इतिहास व संतसंप्रदाय भावनेची तीव्रपणे दखल घेवून आपण स्वत: यामध्ये त्वरित लक्ष घालावे **व श्रीक्षेत्र भंडारा व भामचंद्र या दोन्ही डोंगरासंबंधीत सन २०११ ला राज्य संरक्षित स्मारकांच्या काढलेल्या न्याय अशा मूळ प्राथमिक अधिसूचना महाराष्ट्र शासनाने अंतिम म्हणून घोषित कराव्यात व दोन्हीं डोंगरांच्या संरक्षित क्षेत्रात येणारा भाग संपादित-आरक्षित ठेवणेसाठी मा.मुख्यमंत्री पृथ्वीराजजी चव्हाण यांना गांभीर्याने लक्ष घालण्यास सांगावे.**

*वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे । पक्षीही सुस्वरे आळवीती ।।* पर्यावरण व शांतीचा संदेश देणारी संत तुकोबांची ही पर्वतीय साधनापीठे अबाधित राहावीत एवढीच वारकरी संप्रदाय श्री विठ्ठल भक्तांची आपणाकडे रास्त मागणी आहे. ती पूर्ण व्हावी हीच अपेक्षा.

संत-समर्पित

संतभूमी संरक्षक संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्य

संस्थापक अध्यक्ष - श्री. मधुसूदन महाराज पाटील



॥ श्री विठ्ठल ॥

**॥ तुका म्हणे सत्य कर्मा व्हावे साह्य ! ॥**

संतभूमि संरक्षक संघर्ष समिती

जगद्गुरु संत तुकाराम महाराज साक्षात्कार भूमी श्री क्षेत्र भामचंद्र डोंगर, देहु-पुणे व्दारा,

वारकरी संप्रदाय व महाराष्ट्रातील तमाम जनता जनार्दनासाठी....



# नम्र आवाहन ! - सन-२०१२

ह.भ.प.श्री.------------------------------------------------

सप्रेम जयहरी वि.वि.

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची जन्मभूमि असलेल्या तिर्थक्षेत्र देहू परिसरातील महाराजांच्या वास्तव्य व तपःसाधनेच्या खूणा असलेली साक्षात्कारभूमि श्री क्षेत्र भामचंद्र डोंगर आणि महाराजांनी भागवतादि ग्रंथाचे पारायण जेथे केले असा भजन किर्तनादि मंगलमय अभंगवाणीचा साक्षीदार श्री क्षेत्र भंडारा डोंगर या परिसरात आज औद्योगीकरण (एम.आय.डी.सी.)आल्यामुळे विकासाच्या नावाखाली हे पवित्र डोंगर फोडून त्या ठिकाणी उत्तुंग इमारती व कारखाने उभारणेसाठी, तसेच दगडखाणीसाठी ही भूमि उध्वस्त करण्याचे काम स्वार्थांध धनदांडग्यानी चालवले आहे.

यापूर्वी अनेक वेळा आंदोलने करून या भूमिचे संरक्षणासाठी आपण रस्त्यावर उतरुन तसेच सनदशीर व कायदेशीर मार्गाने लढा देऊन महाराष्ट्र राज्य शासनाला पुरातत्त्व विभागामार्फत या दोन्ही डोंगरांचे जतनासाठी अधिसुचना काढणे भाग पाडले होते. हे तुमच्या आमच्या लढ्याला आलेले यश होते.परंतु हे यश फार काळ टिकेल असे वाटत नाही कारण शासनाने ऑक्टोबर २०११ मध्ये श्री क्षेत्र भामचंद्र डोंगरासंदर्भात व नोव्हेंबर २०११ मध्ये श्री क्षेत्र भंडारा डोंगरासंदर्भात संबंधित विभागामार्फत हे दोन्ही डोंगर ''संत तुकाराम महाराजांचे राज्य संरक्षित स्मारक'' म्हणून ज्या मुळ अधिसुचना काढल्या होत्या त्या पुन्हा बदलण्याचा घाट येथील धनदांडग्यांनी व त्यांच्या संबंधीत राजकिय हस्तकांनी घातला आहे आणि त्याबाबत स्वतःला अनुकुल अशी डोंगर विध्वंसक अधिसुचना काढण्यासाठी ही मंडळी पुरातत्त्व विभागावर दबाव आणीत आहेत. लवकरच अशी अधिसुचना निघण्याची संबंधित विभागाकडून खात्रीशीर माहिती मिळाली आहे.

या लाचार पुढाऱ्यांचे आणि स्वार्थी धनदांडग्यांचे षड्यंत्र हाणून पाडण्यासाठी व जगद्गुरुंच्या पवित्र भूमिचे रक्षण करण्यासाठी आपण सज्ज झाले पाहिजे व त्याचाच एक भाग म्हणून आपण आप-आपल्यापरिने दींडी, संस्था,संस्थान,संघटना व भजनी मंडळा मार्फत तसेच व्यक्तिगत सुध्दा माननीय मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे नावे सदर ऑक्टोबर व नोव्हेंबर २०११ ची संबंधित अधिसुचना बदलु नये यासाठी पत्र पाठवावे व त्या पत्रात या धनदांडग्यांच्या विध्वंसक प्रवृत्तीचा निषेध करावा व त्या पत्राची एक प्रत आप-आपल्या तालुक्यातील तहसिल कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयास माहितीसाठी पाठवावी.

सरकारने जर ही अधिसुचना नव्याने काढून या पवित्र संरक्षित केलेल्या क्षेत्राची व्याप्ती कमी केली तर ही दुष्ट मंडळी संत तुकोबांच्या साक्षात्कार व ध्यान-साधना भूमिची अखंडता धोक्यात आणून या पवित्र डोंगराचे लवकरच लचके तोडायला सुरवात करतील व पुन्हा आपल्याला वारकरी भाविक भक्तांना आंदोलनावाचून पर्याय राहणार नाही. म्हणून जमेल त्याने जमेल तसे आपआपल्या पध्दतीने माननीय मुख्यमंत्री महोदय यांना परखड पत्र पाठवावे व वेळीच निषेध करून श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या चरणी आपली सेवा अर्पण करावी. जर महाराष्ट्र शासनाने या गोष्टीकडे दुर्लक्ष केले तर संताचे पाईक या नात्याने संतपीठ व तिर्थक्षेत्रांचे संरक्षण करणे हे ह.भ.प.महाराज मंडळींचे प्रथम कर्तव्य आहे याची जाण ठेवुन आंदोलनाची तयारी करावी हि कळकळीची विनंती व नम्र आवाहन !

कृपया हे पत्रक वाचून किर्तन, प्रवचन व व्याख्यानादि माध्यमातून सातत्याने प्रबोधन करणेत यावे.

कळावे

जगद्गुरु संत तुकाराम महाराज साक्षात्कार भूमि सेवा ट्रस्ट,भामचंद्र डोंगर केंद्र स्थानिय :-

''संतभूमि संरक्षक संघर्ष समिती ''


✽ पत्रव्यवहाराचा पत्ता ✽

**श्री हरिभक्त मधुसूदन पाटील महाराज**

संस्थापक - संतभूमि संरक्षक संघर्ष समिती

श्री क्षेत्र भामचंद्र डोंगर (देहुच्या उत्तरेला)

पो.वासुली ता.खेड, जि.पुणे- ४१० ५०१